विशेष **दिवाणी दावा क्रमांक २९/२०२५**
कल्याण वि. कार्यकारी अभियंता
निशाणी क्रमांक ७९

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्रमांक ७ यांचा शपथेवर जवाब</u>**
**<u>नांव – दिपक विक्रम गरड वय ३४ वर्षे</u>**
**<u>धंदा – नोकरी एम. एस. इ. बी.</u>**
**<u>रा. चिंचपुर खुर्द, ता. परंडा, जि. उस्मानाबाद</u>**

**वादीतर्फे सरतपास विधिज्ञ एस.बी.खोत यांचेकडून**

१. मी सन २०१३ पासून महावितरण विभाग, शेळगाव ता. परंडा येथे वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहे. आमच्या कार्यालयास या प्रकरणा संदर्भात साक्षीसमन्स प्राप्त झाले आहे. माहे मार्च, २०२२ मध्ये मी अनाळा येथील महावितरण कार्यालयात वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी माझ्याकडे चिंचपुर–खु आणि उंडेगाव अशी दोन गावे होती. उंडेगाव हे अनाळा महावितरण कार्यालयाच्या हद्दीत येत आहे. माहे मार्च, २०२२ मध्ये अनाळा येथे कनिष्ठ अभियंता म्हणून श्री. बळीराम नागरगोजे हे कार्यरत होते. बळीराम नागरगोजे व मी एकाच कार्यालयात काम करीत असल्याकारणाने आमचा एकमेकांशी चांगला परिचय आहे.

२. वादी कल्याण जेकटे यांनी सन २०२२ मध्ये आमच्या कार्यालयास भेट देऊन तोंडी कळविले की, जमीन सर्वे क्रमांक ११/१/क मधील विद्युत तारांचा झोळ पडलेला आहे त्याची दुरुस्ती तात्काळ करावी. वरील घटनेची माहिती कळाल्यानंतर आम्ही आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास विद्युत तारांच्या दुरुस्ती बाबत कळविले होते. विद्युत तारांच्या दुरुस्तीबाबत सर्वप्रथम संबंधित शेतकरी आमच्या कार्यालयात कळवितात. एखाद्या शेतजमिनीत विद्युत तारांमुळे जळीत घटना घडलयास त्याबाबत विद्युत निरीक्षक कार्यालय हे घटनास्थळी जाऊन पाहणी करुन चौकशी अहवाल तयार करतात. चौकशी अहवाल तयार करणेकामी घटनास्थळी महावितरण चे सर्व अधिकारी यांना बोलाविले जाते. जमीन सर्वे क्रमांक ११/१/क मध्ये जळीत घटना घडल्यानंतर चौकशीच्या वेळी घटनास्थळी मला देखील बोलाविण्यात आले होते.. विद्युत

निरीक्षक अधिकारी श्री. हांडे व महावितरणचे अधिकारी श्री. नागरगोजे यांनी मला दिनांक ०८.०३.२०२२ रोजी घटनास्थळी बोलावून घेतले होते. घटनास्थळी माझ्यासह श्री. हांडे, नागरगोजे, मी स्वतः आणि वादी व इतर शेतकरी हजर होते. जमीन सर्वे क्रमांक ११/१/क मध्ये अलका जेकटे व कल्याण जेकटे यांच्या जमिनी असून त्यांच्या दोघांच्या जमिनीत दिनांक ०६.०३.२०२२ रोजी जळीत घटना घडलेली होती. वरील घटनेबाबतची प्रथम खबर उंडेगाव येथील शेतकरी शहाजी बोंदरे यांनी मला फोनद्वारे दिली. घटनास्थळी आम्ही गेल्यानंतर आम्हाला विद्युत तारांमध्ये झोळ पडलेला दिसून आला आणि तारांमधील अंतर कमी जास्त दिसून आले. जळीत घटनेत अलका जेकटे व कल्याण जेकटे यांच्या शेतातील ऊस आणि ठिबक संच जळालेल्या अवस्थेत दिसून आले होते. अलका जेकटे व कल्याण जेकटे यांच्या व्यतिरिक्त मधुकर शेरे यांच्या शेतातील देखील ऊस जळालेला होता. जळीत घटनेच्या संदर्भात झालेल्या चौकशी अहवालाच्या वेळी मी विद्युत निरीक्षक यांच्या समक्ष माझा जबाब नोंदविलेला होता. माझ्यासह श्री. नागरगोजे यांनी देखील त्यांचा जबाब नोंदविलेला होता. महावितरण कार्यालय पुर्ण शासकीय नसून निम्न शासकीय आहे. आता मला माझ्या जबाबाचे प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदर जबाबातील मजकुर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. समक्ष म्हणून श्री. नागरगोजे यांची सही आहे. सदर जबाब **नि. क्र. ८०** वर आहे.

**प्रतिवादी क्रमांक २ व ३ तर्फे उलटतपास विधीज्ञ. श्री. एस. पी. भालेराव यांच्याकडून**

३. या प्रकरणाचे साक्षीसमन्स प्राप्त झालेबाबत मी आमच्या वरिष्ठ कार्यालयातील अधिकारी यांना कळविले आहे. साक्षीसमन्स करिता मी न्यायालयात जात आहे अशी नोंद आमच्या कार्यालयातील रजिस्टरमध्ये मी केलेली नाही. माझे वरिष्ठ अधिकारी यांनी मला साक्षीकरिता अधिकारपत्र दिले नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की मला तोंडी आदेश दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, वादी अलका जेकटे व कल्याण जेकटे यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा आर्थिक फायदा व्हावा या हेतुने मी त्यांच्या बाजुने साक्ष नोंदविण्याकरिता आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन आज रोजी मी साक्ष देत आहे.

४. घटनास्थळी चौकशीकरिता हजर राहण्याबाबत मला श्री. हांडे किंवा नागरगोजे यांनी लेखी पत्र दिलेले नव्हते. दिनांक ०६.०३.२०२२ रोजी मला प्रथम घटनेबाबत माहिती मिळालेली होती. साक्षीदार स्वतः सांगतो की, घटना ०६.०३.२०२२ रोजी घडलेली होती. फयुज गेल्यानंतर वायरमन त्याची दुरुस्ती करीत असतो. शेतकऱ्यांना फयुजची दुरुस्ती करण्याचा अधिकार नसतो. हे म्हणणे खरे आहे की माझ्या जबाबात घटनास्थळी असलेल्या डी. पी मध्ये फयुजमध्ये योग्य त्या क्षेमतेपेक्षा कमी क्षेमतेची तार दिसून आली आणि ती सर्व तार अॅल्यूमिनिअमची होती. हे म्हणणे खरे आहे की फयुज तार तांब्याची असते. हे म्हणणे खरे आहे की फयुजमध्ये कार्यालयामार्फत टाकलेली तांब्याची तार असल्यास विद्युत पुरवठयाचा दाब वाढल्यास किंवा वारा सुटल्यास फयुज उडून विद्युत पुरवठा खंडीत होतो. अॅल्युमिनिअमची फयुज तार आमच्या कार्यालयामार्फत टाकण्यात आली नव्हती. सदरची तार संबंधित शेतकऱ्यांनी टाकलेली असावी. हे म्हणणे खरे आहे की, फयुज तार अॅल्युमिनिअमची असल्यास विद्युत पुरवठयाचा दाब वाढल्यास किंवा वार सुटल्यास विद्युत पुरवठा खंडीत होत नाही. अॅल्युमिनिअमची तार जर शेतकऱ्याने फयुजमध्ये टाकलेली असल्यास आणि जळीत घटना घडल्यास त्या घटनेस संबंधित शेतकरी जबाबदार असतो आमचे कार्यालय जबाबदार नसते. हे म्हणणे खरे नाही की वादीच्या सांगण्यावरुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. मधुकर शेरे यांनी त्यांच्या शेतातील ऊस जळाल्याबाबत आमच्या कार्यालयात तक्रार नोंदविलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी किंवा आमचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी जाऊन चौकशी केली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझा जबाब समक्ष म्हणून श्री नागरगोजे यांनी लिहिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.03.27 16:27:49 +0530

दिनांकः–२७.०३.२०२६

**अ. अ. शेख**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 27-03-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 27-03-2026 |
| Order uploaded on | - | 27-03-2026 |